दै. सत्यप्रभा दि. 23/05/2025



दैनिक सत्यप्रभा

## अवैध व्यवसाय विरोधी अभियान

# परिक्षेत्रांतर्गत चार जिल्ह्यात साडेचार कोटींचा मुद्देमाल जप्त



नांदेड,दि.२२ – नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या आदेशानुसार नांदेडसह हिंगोली परभणी आणि लातूर या चार जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या अवैध धंद्या विरोधात गेल्या काही दिवसांपासून राबविण्यात येत असलेल्या अवैध व्यवसाय विरोधी अभियानाच्या तिसऱ्या आठवड्यात केलेल्या ३७३ कारवाईमधून सुमारे साडेचार कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नांदेड परिक्षेत्रांत सुरू असलेल्या अवैध दारू, मटका, जुगार, ऑनलाइन लॉटरी, क्रिकेट बेटिंग, गुटखा, अंमली पदार्थ, वेश्याव्यवसाय, वाळू उपसा व वाहतूक तसेच अवैध प्रवासी वाहतुकीला आळा घालण्यासाठी पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या आदेशानुसार दि. १ मे म्हणजेच महाराष्ट्र दिनापासून परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत अवैध व्यवसाय विरोधी अभियान १ चे आयोजन करण्यात आले आहे.

या मोहिमेत, सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, अंमलदार यांचेसह सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व अपर पोलीस अधीक्षक हे सहभागी झाले आहेत. त्याचप्रमाणे, स्थानिक गुन्हे शाखा व विशेष पोलीस पथके देखील सहभागी झाली असून संबंधित जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांची अवैध व्यवसाय विरोधी कारवायांवर वैयक्तिक देखरेख आहे. या मोहिमेदरम्यान पहिल्या दोन आठवडयात ८१३ अवैध व्यावसायिकांविरुध्द ८०३ कारवाई करून एकूण २ कोटी ३३ लाख ९५ हजार ३६० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला होता. त्यानंतर दि.१५ ते २१ मे दरम्यान या मोहिमेच्या तिसऱ्या आठवडयात ४६७ अवैध व्यावसायिकांचे विरुद्ध ३७३ केसेस करण्यात आल्या असून एकूण ४ कोटी ४८ लाख ६० हजार ९५५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

तरी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाण्यास अथवा पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाच्या संकेतस्थळावर कळवून अशा अवैध व्यवसायांचा बिमोड करण्यासाठी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे,असे आवाहन पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.अवैध व्यवसायांचा बीमोड करण्यासाठी नागरिकांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे